# पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**ठिकाण :- गंगाधर देशमुख सभागृह,**
**आरसीएफ कॉलनी, चेंबूर,**
**मुंबई-४०००७४.**

**दिनांक:- २६.११.२०२१**
**वेळ:-सकाळी ११.०० वाजता**

**प्रस्ताव:**

मे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड, भारत सरकारचा उपक्रम (खत विभाग, रसायन आणि खत मंत्रालय) यांच्या ट्रॉम्बे, मुंबई येथील विद्यमान अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट संयंत्राची वार्षिक उत्पादन क्षमता सध्याच्या १.४ लाख मे. टन पासून १.९ लाख मे. टन पर्यंत वाढवण्याबाबत.

**पार्श्वभूमी:**

प्रकल्प प्रवर्तक - आरसीएफ, ने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण (म.प्र.नि.) मंडळाकडे आरसीएफ च्या ट्रॉम्बे, मुंबई येथील विद्यमान अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट संयंत्राची वार्षिक उत्पादन क्षमता सध्याच्या १.४ लाख मे. टन पासून १.९ लाख मे. टन पर्यंत वाढवण्याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी चा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावासाठी जनसुनावणीसाठी योग्य तारीख सुचवावी अशी विनंती म.प्र.नि. मंडळामार्फत जिल्हा दंडाधिकारी, मुंबई उपनगर यांना दि. २८/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये केली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगर, यांनी दिनांक २६/११/२०२१ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर "दैनिक नवशक्ति" या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच "दैनिक फ्री प्रेस जर्नल" या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक २२/१०/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.

सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी सादर केलेल्या पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवालाच्या प्रती इंग्रजी आणि मराठी भाषेत, जनतेच्या अभ्यासासाठी खालील ठिकाणी ठेवण्यात आल्या होत्या :

१. मा. जिल्हाधीकारी, मुंबई उपनगरे यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, १०वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई,
२. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई,
३. सह संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई,
४. सहाय्यक आयुक्त, एम (पश्चिम) वार्ड, ऑफिस बिल्डींग, शरदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई,
५. उद्योग सहसंचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई शहर व उपनगरे, ७०२, ७ वा मजला, विकास सेंटर, डॉ. सी. जी. गिडवानी मार्ग, वाडवली गाव, चेंबूर, मुंबई,
६. प्रादेशिक अधिकारी / उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई.

या प्रस्तावित प्रकल्पाबाबत सर्वसामान्य जनतेस त्यांच्या प्रतिक्रिया, विचार, सूचना किंवा हरकती पाठविण्यासाठी आवाहन करण्यात आले होते.

**पर्यावरण विषयक जनसुनावणी:**

मे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) द्वारा ट्रॉम्बे, मुंबई येथील त्यांच्या विद्यमान अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट संयंत्राची वार्षिक उत्पादन क्षमता सध्याच्या १.४ लाख मे. टन पासून १.९ लाख मे. टन पर्यंत वाढवण्याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी २६ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता, गंगाधर देशमुख सभागृह, आरसीएफ कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००७४ या ठिकाणी आयोजित करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ च्या कार्यालयीन आदेश E-१०४/२०२१ दिनांक ०३/११/२०२१ नुसार, गठित केलेल्या समितीचे खालील सदस्य उपस्थित होते :

१. **डॉ. विकास नाईक** - **अध्यक्ष**
निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

२. **श्री. जयवंत हजारे** - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

३. **श्री. सुजीत ढोलम** - **समन्वयक**
उपप्रादेशिक अधिकारी मुंबई-३,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आरसीएफ च्या ट्रॉम्बे, मुंबई येथील विद्यमान अमोनियम नायट्रेट (एएन) मेल्ट संयंत्राची वार्षिक उत्पादन क्षमता सध्याच्या १.४ लाख मे. टन पासून १.९ लाख मे. टन पर्यंत वाढवण्याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त खाली दिल्याप्रमाणे आहे:

सर्वप्रथम जनसुनावणीचे समन्वयक श्री सुजीत ढोलम यांनी सर्वांचे स्वागत करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीच्या कार्यवाहीस सुरवात केली.

त्यांनी हि जनसुनावणी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेले (MoEFCC) पर्यावरण आघात मूल्यांकन अधिनियम, २००६ नुसार, तसेच कोविड-१९ महामारी बाबत ऑफिस मेमोरंडम दिनांक ०९/०६/२०२१ च्या तरतूदींनुसार घेण्यात येत आहे असे सांगितले.

या जनसुनावणीचा उद्देश स्थानिक लोकांना प्रस्तावित प्रकल्पा विषयी जागरूक करणे आणि प्रकल्पाच्या प्रस्तावकांच्या प्रस्तावित पर्यावरण व्यवस्थापन योजनाची माहिती देणे हा आहे.

प्रकल्पाच्या प्रस्तावकांचे प्रकल्प सल्लगार – मे. प्रोजेक्ट्स अँड डेव्हलपमेंट इंडिया लिमिटेड, प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर उपस्थित नागरिक त्यांच्या सूचना/विचार सादर करू शकतात. तसेच ते लेखी स्वरूपातही सादर करता येईल असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी पुढे माहिती दिली की मे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड ट्रॉम्बे, मुंबई येथील विद्यमान अमोनियम नायट्रेट मेल्ट प्लांटमधून वार्षिक १.४ लाख मे. टन पासून १.९ लाख मे. टन पर्यंत एएन

मेल्टचे उत्पादन वाढवण्याचा प्रस्ताव आहे. प्रस्तावित उत्पादन वाढीसाठी सध्याच्या प्लांटमध्ये कोणत्याही बदलाची आवश्यकता नाही. हा प्रस्ताव 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत एक उपक्रम आहे.

तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, रहिवाश्यांच्या टीका व टिपणींची नोंद घेऊन त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हा असून, प्रकल्पास पर्यावरण विषयक अनुमति देण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार या समितीस नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी असे श्री. ढोलम यांनी स्पष्ट केले.

प्रकल्पाच्या प्रस्तावकांच्या वतीने, श्री. ए. के. सिंह, महाप्रबंधक, मे. प्रोजेक्टस अँड डेवेलपमेंट इंडिया लिमिटेड (पी.डी.आय.एल) – पर्यावरणविषयक प्रकल्प सल्लागार, यांनी प्रकल्पा बाबत तपशीलवार प्रस्तुतीकरण केले आणि पर्यावरण आघात मूल्यांकन अभ्यासाचा तपशील सादर केला.

तदनंतर श्री. सुजित ढोलम, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई-3 यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रश्न-उत्तरांसाठी सत्र खुले केले व प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक प्रश्न विचारण्यासाठी उपास्थितांना आमंत्रित केले. तसेच प्रश्न विचारताना प्रश्नकर्त्याने सुरूवातीला आपले नाव आणि पत्ता सांगावा अशी सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न आणि टिप्पण्यांचा तपशील आणि प्रकल्प प्रस्तावकांच्या प्रतिनिधींनी दिलेली उत्तरे खालीलप्रमाणे सारांशित केली आहेत:**

१) **श्री विलास पाटिल, केदारनाथ, चेंबूर**

**प्रश्न:** चेंबुर मधील रहिवाश्यांना या प्रकल्पामुळे वायु प्रदूषण, जल प्रदूषण किंवा ध्वनि प्रदुषण आणि वाहतुक या वर काय परिणाम होईल ? आरसीएफ अनेक समाज उपयोगी कार्य करत आली आहे. त्यात महत्वाचे काम म्हणजे कोरोना साथीच्या काळात आरसीएफ ने नागरीकांना मोफत कोविड लसीकरणाची सोय उपलब्ध करून दिली ज्याचा चेंबूरच्या नागरिकांना फायदा झाला. तसेच आरसीएफने इतर समाजपयोगी योजना चेंबूरच्या नागरिकांसाठी उपलब्ध करून द्याव्यात अशी मी आरसीएफ व्यवस्थापनाला विनंती करतो.

**उत्तर:** प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आरसीएफ च्या विद्यमान अमोनिअम नायट्रेट मेल्ट संयंत्राची अंगभूत उत्पादन क्षमता १.९ लाख मेट्रिक टन प्रतिवर्ष आहे. एएन मेल्ट उत्पादन वाढवण्याचे महत्वाचे कारण म्हणजे कोळसा खाण कंपन्यांकडून एएन मेल्टची वाढलेली गरज. आत्मनिर्भर भारतला प्रतिसाद म्हणून, आपल्या विद्यमान सायंत्राची अंतर्निहित क्षमता वापरून देशांतर्गत एएन मेल्ट चेउत्पादन वाढवण्याचा आरसीएफचा मानस आहे. एएन मेल्टची वाढीव उपलब्धता कोळसा खाण कंपन्यांना वीज निर्मितीसाठी पुरेसा कोळसा पुरवठा करण्यास मदत करेल. हे एएन मेल्ट पुरवण्यासाठी आरसीएफ चा फार मोठा सहभाग आहे आणि तो अधिकाधिक असावा यासाठी हा प्रस्ताव सादर केला आहे.

एएन मेल्ट ची उत्पादन क्षमता वाढून देशाला वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात आत्मनिर्भर करण्यासाठी हा प्रस्ताव मांडलेला आहे. सुरवातीपासून आरसीएफ मध्ये विद्यमान एएन मेल्ट संयंत्र अतिशय सुरक्षितपणे आणि सर्व वैधानिक नियमांचे पालन करुन चालू आहे. कोळशाची उपलब्धता वाढल्याने विजेची उपलब्धता वाढेल आणि संपूर्ण देशाला याचा फायदा होईल.

या प्रकल्पामुळे वायु प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनि प्रदूषण आणि वाहतुकीवरती नगण्य परिणाम होईल.

२) **श्री संजय परांजपे, टिळकनगर, चेंबूर**

**टिप्पणी:** आरसीएफ हा एक केमिकल्स आणी खतांचा कारखाना असून "व्यावसायिक सामाजिक जबाबदारी" चे (सीएसआर) कार्य करत असते. आरसीएफ चेंबूर परिसरातील लोकांना त्यांच्या "व्यावसायिक सामाजिक जबाबदारी" (सीएसआर) द्वारे नेहमीच मदत करत असते. एएन मेल्ट संयंत्राची क्षमता वाढवली तर देशाची आत्मनिर्भरता वाढेल आणि आयात कमी होईल आणि प्रस्तावित एएन मेल्ट संयंत्राच्या उत्पादन वाढीसाठी आरसीएफ सक्षम आहे असे मला वाटते.

३) **श्री अविनाश शेवाळे, वाडवली गाव, चेंबूर.**

**प्रश्न:** आरसीएफ च्या सीएसआर फंडातून शताब्दी रुग्णालयामध्ये ऑक्सिजन प्लांट उभा केला आणि कोरोना संसर्गाच्या काळामध्ये आसपासच्या परिसरातील नागरिकांना मोफत लसीकरण सुद्धा उपलब्ध करुन दिले त्याबद्दल आरसीएफ चे मी आभार मानतो. आरसीएफ सीएसआर फंडाच्या माध्यमातून अनेक जनहिताचे काम करत असते, जसे की दीड-दोन वर्षापूर्वी गरीब गरजू लोकांसाठी मोबाईल ॲम्ब्युलन्स सेवा चालू केली होती, ती आता बंद केलेली आहे तरी ती पुन्हा सुरू करावी ही विनंती.

**उत्तर:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले कि करोना साथी संबंधीत प्रतिबंधात्मक उपाययोजना व नियमानुसार मोबाईल मेडिकल व्हॅनची सुविधा बंद केली गेली होती. ही सेवा पुन्हा चालू करण्याचे विचाराधीन आहे.

४) **श्री रवींद्र कदम, चेंबूर.**

**प्रश्न:** ह्या प्रकल्पाच्या संदर्भात मला असे विचारायचे आहे कि एएन मेल्ट संयंत्राची उत्पादन क्षमता वाढल्यानंतर टँकर्स ची संख्या वाढेल तर आरसीएफ गेट क्र. २ च्या बाहेर टँकर्सची गजबज मोकळी करण्यासाठी आरसीएफ ने काय तरतूदी केल्या आहेत?

**उत्तर:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले की एएन मेल्ट चे उत्पादन वाढल्यामुळे एकूण टँकरच्या संख्येत नगण्य बदल होईल. कारण नायट्रिक ॲसिड आणि अमोनिया जे एएन मेल्टसाठी कच्चामाल आहे टँकर्सद्वारे विकले जाते आणि एएन मेल्टचे उत्पादन वाढल्याने या अमोनिया आणि नायट्रिक ॲसिडचा इन हाऊस वापर वाढेल. यामुळे अमोनिया आणि नायट्रिक ऍसिडच्या विक्री समतुल्य प्रमाणात कमी होईल आणि परिणामी अमोनिया आणि नायट्रिक ॲसिडच्या टँकरची संख्या देखील कमी होईल. अशा प्रकारे टँकरच्या एकूण संख्येत नगण्य बदल होणार आहे. आरसीएफने पुढे माहिती दिली की त्यांनी आरसीएफ ट्रॉम्बे फॅक्टरी गेट क्र. २ च्या समोरील च्या टँकर्स पार्किंग क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत. असेही लक्षात आले आहे कि आरसीएफ गेट क्र. २ च्या बाहेरील रस्त्या लगत काही टँकर्स अनधिकृतपणे पार्किंग केलेले असतात. या संदर्भात आरसीएफ ने बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच वाहतूक पोलीस विभागाच्या संबधित अधिकाऱ्यांना देखील कळवले आहे. गेट क्र. २ च्या बाहेरील वाहतूक कोंडी कमी होण्यासाठी आरसीएफ नेहमीच प्रयत्न करत असते आणि यापुढे सुद्धा प्रयत्न करत राहील.

५) **श्री सदानंद पाटील, वाशीगाव, चेंबूर.**

**प्रश्न:** आरसीएफ ने मागील तीन वर्षा मध्ये वृक्षारोपण मध्ये किती प्रगति केली आहे ? आणि त्यांना विनंती आहे की चेंबूर ग्रीन प्रकल्प पुन्हा सुरू करावा.

**उत्तर:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले कि गेल्या चार दशकात आरसीएफ ३.५ लाख पेक्षा जास्त झाडे चेंबूर आणि आसपासच्या परिसरात लावली आहेत. त्यामुळे चेंबूर परिसर हा "ग्रीन झोन" म्हणून ओळखला जातो. ह्यामध्ये आरसीएफ चे खूप मोठे योगदान आहे. गेली अनेक वर्षे आमचा हा उपक्रम सुरूच आहे. गेल्या तीन वर्षात या योजने अंतर्गत आरसीएफने १०,००० हून अधिक झाडे लावली आहेत व जवळपासच्या सोसायट्या, सामाजिक संस्थाना झाडांच्या रोपट्यांचे वाटप केले आहे. स्वारस्य असलेले लोक आवश्यक असल्यास रोपांसाठी आरसीएफशी संपर्क साधू शकतात.

६) **श्री सतीश देशपांडे, वाशीगाव, चेंबूर.**

**प्रश्न:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले की "चेंबूर ग्रीन" प्रोजेक्ट अंतर्गत लाखो झाडे लावली गेली आणि त्यामुळे चेंबूर मध्ये हरीत क्रांती झाली. आरसीएफ चेंबूर ग्रीन सारखा प्रकल्प पुन्हा राबवणार आहे का?

**उत्तर:** चेंबूर आणि आरसीएफच्या परिसरात वृक्षारोपणामुळे खूप हिरवळ झाली आहे आणि आणखी झाडे लावण्यासाठी मर्यादित जागा उपलब्ध आहे. तरीही उपलब्ध जागेत आरसीएफ मार्फत वृक्षारोपणाचे कार्य सुरूच ठेवू आणि हरीत पट्टा विकासासाठी (ग्रीन बेल्ट डेवलपमेंट) साठी आरसीएफ कडून इच्छुक असलेल्यांना मनापासून पाठिंबा देईल .

७) **श्री विलास पाटिल, केदारनाथ, चेंबूर.**

**प्रश्न:** दिवसा व रात्री ऑक्सिजन उत्सर्जन करणारी झाडे आहेत का ? अशा झाडांची लागवड करण्यासंदर्भात आरसीएफ ची काही योजना आहे का? आणि अशा प्रकारच्या झाडांची रोपटी आरसीएफ ला पुरवता येतील का?

**उत्तर:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले की आरसीफ स्थानिक प्रजाती चे वृक्ष निवडते ज्याच्या "रूट सिस्टम" (मुळे) मजबूत आहे, जे जास्त ऑक्सिजन देतात आणि जास्त कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेतात. ह्या मध्ये कडूनिंब, पिंपळ, बांबू, वड, तुळस, जांभूळ इत्यादि प्रकारची झाडे जास्त ऑक्सिजन देतात आणि त्यांचा पर्यावरणाला चांगला फायदा होतो. ही झाडे विविध ठिकाणी आरसीएफ ने लावली आहेत.

८) **श्री. जयवंत हजारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.**

**प्रश्न:** अमोनिया स्टोरेज किती आहे, किती वाढणार आहे आणि आरसीएफने अमोनिया स्टोरेज संदर्भात सुरक्षा खबरदारीच्या काय उपाययोजना केल्या आहेत?

**उत्तर:** प्रकल्प प्रस्तावकाने सांगितले कि आपल्याला अमोनिया व नायट्रिक ॲसिड दोन्हीही बाहेरुन घ्यायची गरज नाही, आपल्याकडे या दोन्हींचे इन-हाऊस उत्पादन होते. एएन मेल्ट चे जे प्रस्तावीत वाढीव उत्पादन आहे त्यात बाहेरील अमोनियाची कोणतीही वाढ होणार नाही. त्यामुळे अमोनिया स्टोरेज मध्ये वाढ करण्याची आवश्यकता नाही आणि आरसीएफ अमोनियाचा साठा कमीत कमी राखण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते.

९) **श्री शाम चंद्रगिरी, डोंगरे पार्क, चेंबूर.**

**प्रश्न:** आरसीएफच्या कारखाना परिसरामध्ये अमोनियम नाइट्रेट च्या संदर्भात सर्व सुरक्षाव्यवस्था आहेत या बद्दल काही शंकाच नाही. पण टँकर्स भरल्या नंतर जेव्हा बाहेर येतील ते त्यांच्या गंतव्यस्थानी जाईपर्यंत सुरक्षित पणे वाहतूक व्हावी ह्या साठी कोणत्या प्रकारची दक्षता घेतली जाते किंवा त्यासाठी काय उपाय योजना आहेत?

**उत्तर:** अमोनियम नाइट्रेट हे पेट्रोलियम आणि विस्फोटक सुरक्षा संघटना (पेसो) च्या अंतर्गत नियंत्रित केले जाते. एएन मेल्ट च्या विक्री ऑर्डर निघताना पेसो च्या साईटवर ऑर्डर तयार होते. शिवाय टँकर लोड करण्यापासून ते अनलोडिंगपर्यंत जीपीएस (GPS) सह ट्रैकिंग केले जाते. डिस्पॅचच्या २४ तास अगोदर, डिस्पॅच आणि गंतव्य स्थानाची सूचना जिल्हा एसपी (पोलीस अधीक्षक) यांना दिली जाते. प्रवासादरम्यान, जीपीएस (GPS) सह टँकर चे ट्रॅकिंग केले जाते. जर टँकर सहा तास पेक्षा जास्त वेळ थांबत असेल तर आम्ही तशी तेथील स्थानिक पोलीस स्टेशनला माहिती देतो. मटेरियल पोहोचल्यानंतर खरेदीदाराकडून तशी त्याची पावती घेतली जाते.

समितीच्या अध्यक्षांनी अधिवेशनाचा समारोप केला आणि संगितले की लोकांनी उपस्थित केलेल्या सर्व शंकांचे प्रकल्प प्रवर्तकाने समाधानकारकपणे निराकरण केले आहे.

शेवटी जन सुनावणी समितीचे समन्वयक श्री. सुजित ढोलम यांनी सांगितले कि उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आली आहे. तसेच, आजच्या जनसुणावणीचे इतिवृत्त व सार्वजनिक सुनावणी सहभागी असलेल्यांची निवेदने ही पुढे पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (MoEFCC), भारत सरकार यांचेकडे पाठविली जातील.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी उपस्थित राहून शांततेत आपले विचार मांडल्याबद्दल श्री. सुजित ढोलम यांनी उपस्थितांची आभार मानले. समितीचे समन्वयक श्री. सुजित ढोलम यांनी माननीय अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले व अध्यक्षांचे आभार मानून सभेची सांगता झाली.

**(श्री. सुजीत ढोलम)**
उपप्रादेशिक अधिकारी मुंबई-3,
म. प्र. नि. मंडळ, मुंबई
तथा समन्वयक
जनसुनावणी समिती

**(श्री. जयवंत शं. हजारे)**
प्रादेशिक अधिकारी (अति. प्रभार)
म. प्र. नि. मंडळ, मुंबई
तथा सदस्य
जनसुनावणी समिती

**(डॉ. विकास नाईक)**
निवासी उप जिल्हाधिकारी तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा व अध्यक्ष
जनसुनावणी समिती

*******************************************************

# Minutes of Meeting for the Environmental Public Hearing

**Venue- Gangadhar Deshmukh Hall, RCF Colony, Chembur, Mumbai 400074**

**Date-26.11.2021**
**Time-11.00 AM**

**Proposal:**

AN melt production enhancement from 1.4 lakh MT to 1.9 lakh MT per annum from the existing Ammonium Nitrate (AN) Melt plant at M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited Trombay, Mumbai a Government of India Undertaking (Department of Fertilizers, Ministry of Chemicals and Fertilizers).

**Background:**

Maharashtra Pollution Control Board (MPCB) received an application from project proponent – M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited, for conducting an environmental public hearing regarding proposed AN melt production enhancement from 1.4 lakh MT to 1.9 lakh MT per annum. MPC Board requested to District Magistrate, Mumbai Suburban vide letter dated 28.09.2021 to suggest suitable date for the Public hearing for said proposal.

District Magistrate, Mumbai Suburban, has fixed the date for conducting environmental public hearing on 26/11/2021. The advertisement for this public hearing was published one month in advance in the daily newspaper "Navshakti" in Marathi language and also in the daily newspaper "The Free Press Journal" in English language on 22/10/2021.

Copies of the Environmental Impact Assessment Report in English and Marathi language submitted by the Project Proponent of the proposed project were made available at the following offices for public study:

i) Office of the Collector, Mumbai Suburban, 10th Floor, Administrative Building, Government Colony, Bandra (East), Mumbai,

ii) Department of Environment, Government of Maharashtra, 15th Floor, New Administrative Building, Mantralaya, Mumbai,

iii) Joint Director (Water Pollution Control), MPC Board, Sion, Mumbai,

iv) Assistant Commissioner, M (West) Ward, Office Building, Sharadbhau Acharya Marg, Chembur, Mumbai.

v) Joint Director of Industries Mumbai, Metropolitan Region, Mumbai City & Suburbs, 702, 7th Floor, Development Center, Dr. C. G. Gidwani Marg, Wadwali Village, Chembur, Mumbai,

vi) Regional Officer / Sub-Regional Office, MPC Board, Sion, Mumbai.

The public in general were appealed to send in any comment, view, suggestions or objections regarding the proposed Project.

**Public hearing:**

The Environmental Public Hearing for proposed AN melt production enhancement from 1.4 lakh MT to 1.9 lakh MT per annum from the existing Ammonium Nitrate (AN) Melt plant at Trombay, Mumbai, of M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited (RCF) was held on 26/11/2021 at 11:00 AM at Gangadhar Deshmukh Hall, RCF Colony, Chembur, Mumbai 400074.

As per Office order No. E-105/2021 dated. 03/11/2021 of Maharashtra Pollution Control Board, following committee members were present:

1. **Dr. Vikas Naik** - **Chairman**
   Addl. District Magistrate,
   Mumbai Suburban District
2. **Shri. J. S. Hajare** - **Member**
   Regional Officer,
   Maharashtra Pollution Control Board, Mumbai
3. **Shri. Sujit Dholam** - **Convener**
   Sub-Regional Officer, Mumbai-3,
   Maharashtra Pollution Control Board, Mumbai

Minutes of the meeting for the Environmental Public Hearing for proposed AN melt production enhancement from 1.4 lakh MT to 1.9 lakh MT per annum from the existing Ammonium Nitrate (AN) Melt plant at M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited Trombay, Mumbai, is as given below.

At the outset, Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPCB the Convener of the public hearing, welcomed all.

With the permission of the Chairman, the proceedings of public hearing were started. Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPCB informed that this public hearing was being held in accordance with the provisions of the Environmental Impact Assessment Notification, 2006 and the provisions of the Office Memorandum dt. 09/06/2021 regarding Covid-19 pandemic issued by the Ministry of Environment, Forests and Climate Change (MoEFCC).

Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPCB Convener of the committee informed that the purpose of this public hearing is to make local people aware about the proposed project and the environment management plan proposed by the Project Proponent.

Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPCB explained that, at the beginning, the Project Consultant of the Project Proponent - M/s Projects and Development India Limited, will present information about the project and then the residents can express their suggestions / views. He further stated that the same can also be submitted in writing.

He further informed that the proposal is for production enhancement of AN Melt from 1.4 lakh MT to 1.9 lakh MT per annum from the existing Ammonium Nitrate (AN) Melt plant at M/s Rashtriya Chemicals and Fertilizers Limited Trombay, Mumbai. No modification is required in the existing plant for proposed production enhancement. The proposal is an initiative under 'Aatmnirbhar Bharat' Abhiyan.

Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPCB also informed that the scope of this committee is to conduct public hearings, take note of the objections and comments of the local people and submit the proceedings to the Government. He informed the audience that this committee is not empowered to take any decisions as regards to granting of any environment related permissions to the said project.

On behalf of the Project Proponents, Shri. A. K. Singh, General Manager, M/s Projects and Development India Limited (PDIL), the Environmental Consultant of the project, gave a detailed presentation about the project and details of the Environmental Impact Assessment Study.

Thereafter, Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Mumbai-3 opened the question and answer session with the permission of Chairman of committee and invited the members of the public to express environmental related concerns regarding the project and asked them to mention their name and address before asking the question.

**Details of the questions asked and comments given by the citizens present and the answers given by the representatives of the Project Proponents to the same are summarized as follows:**

**1) Shri. Vilas Patil, Kedarnath, Chembur**

**Question:** What effect will this project have on the residents of Chembur regarding air pollution, water pollution & noise pollution and on transportation? RCF has been doing lot of social work for the community. More importantly, during the outbreak of Corona pandemic, RCF provided free Covid vaccination to

the surrounding public in Chembur. I also request the RCF management to take up other socially useful schemes for the benefit of the citizens in Chembur.

**Answer:** The Project Proponent stated that RCF's existing Ammonium Nitrate Melt plant has a capability to produce 1.9 lakh MT per annum. An important reason for increasing production of AN Melt is the increased need of AN melt by Coal Mining companies. As a response to the Atmanirbhar Bharat, RCF intends to utilise its inherent capacity of its existing plant to increase the domestic AN melt production. The increased availability of AN melt shall help the coal mining companies to supply sufficient coal for electricity generation. RCF plays a vital role in supplying AN Melt and subject proposal has been submitted to ensure better availability of AN melt to the coal mining industry.

The proposal is aimed to increase the production of AN Melt to make the country self-sufficient in power generation. Since its inception, the existing AN Melt plant at RCF has been operating very safely and in compliance with all statutory regulations. Increasing the availability of coal will increase the availability of electricity and will benefit the Nation as a whole.

The project will have negligible impact on air pollution, water pollution, noise pollution and transportation.

**2) Shri. Sanjay Paranjape, Tilaknagar, Chembur**

**Comment:** RCF is a Chemical and Fertilizer Company and is doing lot of activities under "Corporate Social Responsibility" (CSR). RCF always helps the people of Chembur area through their CSR activities. Increasing the production of the AN Melt plant will certainly increase the country's self-reliance and reduce imports, and I think RCF is capable of increasing the production of the AN melt plant.

**3) Shri. Avinash Shewale, Wadwali village, Chembur.**

**Question:** I am grateful to RCF for setting up an Oxygen plant at Shatabdi Hospital from RCF's CSR fund and also for providing free vaccination to the people in the vicinity during the time of Covid pandemic. RCF has done good social work through their CSR activities, such as the mobile ambulance service (Medical Van) for the needy, which was operational a year and a half ago, but is now stopped. It is requested to restart the same.

**Answer:** The Project Proponent informed that the facility of mobile medical van was stopped as per the preventive measures and regulations related to the Covid pandemic. The restart of the service of Mobile Medical Van is under consideration.

**4) Shri. Ravindra Kadam, Chembur.**

**Question**: In the context of this project, I would like to ask, will the number of tankers increase as the production of AN Melt increases? What are the provisions RCF is taking for clearing congestion of tankers outside of RCF Factory Gate No. 2?

**Answer:** The Project Proponent stated that there will be only a negligible change in the total number of tankers due to increase in AN Melt production. This is because, Nitric Acid and Ammonia which are raw material for AN melt are being sold by tankers and increasing production of AN Melt will lead to increase in in-house consumption of this Ammonia and Nitric Acid. This will result in equivalent reduction of sale of Ammonia and Nitric Acid and thereby reduction in tanker movement of Ammonia and Nitric acid. Thus there will be a negligible change in the total number of tankers.

Also RCF further informed that it has made improvements to the dedicated tanker parking area in front of the RCF Trombay Factory Gate No. 2 for tankers transporting RCF products. It has been noticed that some unauthorized tankers are parked on the road near RCF Gate No 2. In this regard, RCF has taken-up the matter with concerned officials of Brihanmumbai Municipal Corporation (BMC) and also with Traffic Police Department. RCF has always worked and will continue to work to reduce traffic congestion outside Gate No. 2.

**5) Shri. Sadanand Patil, Vashigaon, Chembur.**

**Question**: How much progress has RCF made in the last three years in tree plantation activity? RCF is requested to restart the "Chembur Green" Project.

**Answer**: The Project Proponent stated that RCF has planted more than 3.5 lakh trees in and around Chembur in the last four decades. Because of this efforts of RCF, Chembur is known for its "Green Zone". RCF has had a huge contribution in this. RCF have been doing this for the past several years. In the last three years, under this scheme, RCF has planted more than 10,000 saplings and distributed saplings to nearby housing societies and social organizations. RCF offered that interested people can contact RCF for saplings as may be needed.

**6) Shri. Satish Deshpande, Vashigaon, Chembur.**

**Question**: The project proponent said that millions of trees were planted under the "Chembur Green" project, which led to a green revolution in Chembur. Will RCF restart the Chembur Green project?

**Answer**: The area around Chembur and RCF has become very green due to trees planted and now there is limited space available for planting more trees.

However, RCF will continue to plant trees in the available space and RCF shall wholeheartedly support those interested in taking samplings from RCF for green belt development.

**7) Shri. Vilas Patil, Kedarnath, Chembur.**

**Question**: Are there plants that release Oxygen during day and night? Does RCF have any plans to plant such trees? And can RCF supply such saplings?

**Answer**: The Project Proponent informed that RCF selects trees that have strong root systems, which provide more oxygen and absorb more carbon dioxide. Such trees include Neem, Peepal, Bamboo, Banyan tree, Tulas, Jamun etc. These varieties provide more Oxygen and are of great benefit to the environment. These varieties have been planted by RCF at various places.

**8) Shri. Jaywant Hazare, Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Mumbai.**

**Question**: How much Ammonia storage is there, how much will be increase in Ammonia storage and what are the precautionary safety measures taken by RCF regarding Ammonia storage?

**Answer**: The Project Proponent informed that there is no need to get both Ammonia and Nitric acid from outside, since both of them are produced in-house. There will be no increase in Ammonia requirement from outside due to the proposed increase in AN Melt production. Therefore, there will no need to increase Ammonia storage. RCF always strives to keep minimum Ammonia stock.

**9) Shri Sham Chandragiri, Dongre Park, Chembur.**

**Question**: There is no doubt that RCF's factory premises have all the safety precautions regarding Ammonium Nitrate. But after the tanker is loaded, what precautions are taken to ensure safe transportation till they reach their destination?

**Answer**: The Project Proponent informed that Ammonium Nitrate is regulated by the "Petroleum and Explosives Safety Organization" (PESO). Indents are created on PESO's website by customers when AN Melt's requirement is received. Further, GPS tracking of AN tankers is done from despatch to destination location. Also, intimation is given to District SP (Superintendent of Police) of dispatch and destination location, 24 hours prior to dispatch. If the tanker halts for more than six hours at one location, the local police station is informed about the same. Receipt is obtained from the buyer as soon as the material is delivered.

The Chairman of the Committee concluded the session and informed that all the queries raised by the people have been addressed satisfactorily by the Project Proponent.

Finally, the Convener of the public hearing committee, Shri. Sujit Dholam, Sub-Regional Officer, MPC Board said that points raised by the audience have been noted. Also, the minutes of today's public hearing along with submissions of the public hearing participants will be forwarded to the Ministry of Environment, Forests and Climate Change (MoEFCC), Government of India. After that, Shri. Sujit Dholam thanked the audience for attending the environmental public hearing of subject project and expressing their views in a peaceful manner. With the permission of the Hon'ble Chairman, the Convener of the committee Shri. Sujit Dholam declared that the Environmental Public Hearing has ended and concluded the meeting by thanking the Chair.

**(Shri. Sujit Dholam)**
Sub-Regional Officer,
MPC Board, Mumbai-3 and
Convener, Public Hearing
Committee

**(Shri. J. S. Hajare)**
Regional Officer,
MPC Board, and Member,
Public Hearing Committee

**(Dr. Vikas Naik)**
Addl. Dist. Magistrate,
Mumbai Suburban District and
Chairman,
Public Hearing Committee

**************************************************

N.B.: Original mom in Marathi Language are signed by chairman of the committee.